**नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग**
**बृहन्मुंबई.**

जा.क्र.उसंनर/बृमुं/मुख्य कार्यालय संदर्भ/ ५६५

CHE/DP/19
2014-15

इन्साहटमेंट, "ई" ब्लॉक,
आझाद मैदान, महापालिका मार्ग,
मुंबई- ४०० ००१
दुरध्वनी क्र. ०२२-२६२०९३१
Email ID :- ddtpgr_mumbai@rediffmail.com

दि. :- ९७ -०५-२०१४.

प्रति,

१) मा. आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई-४००००१.

२) मा. महानगर आयुक्त,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
बांद्रे-कुर्ला संकुल, बांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

३) मा. मुख्य अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,
बांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

४) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण,
बांद्रे, मुंबई-४०००५१.

विषय :- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम २०१४.

संदर्भ :- उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे यांचे पत्र क्र. म.प्रा.व.न.र., (सुधारणा व पुढे चालू ठेवणे)अधि.२०१४नासंघ/टीपीव्ही-७/१६९९, दि.२-४-२०१४.

महोदय,

कृपया संदर्भित नमूद पत्राचे अवलोकन व्हावे, हि विनंती.

विषयांकित प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.५) हा महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-चार, असाधारण क्र.१६ मध्ये दि.१८-३-२०१४ रोजी पृ.क्र.१ ते ५ मराठीमध्ये व महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-आठ, असाधारण क्र.२८ मध्ये दि.१८-३-२०१४ रोजी पृष्ठ क्र.१ ते ५ येथे इंग्रजीमध्ये प्रसिध्द झाले आहेत (सोबत प्रत

उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे यांनी संदर्भिय पत्रात नमूद केले प्रमाणे उपरोक्त राजपत्राची प्रती आपल्या अधिनस्थ सर्व कार्यालयांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविणे बाबत विनंती आहे.

सहपत्रे :- वरीलप्रमाणे.

आपला,

उपसंचालक, नगर रचना,
बृहन्मुंबई यांचेकरीता.

प्रत : मा. उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे, मध्यवर्ती कार्यालय, पुणे-४११००१ यांना माहितीस्तव सादर.

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय
19 MAY 2014
समय: ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८.
दसंउ/१६५१४ क्रमांक: MGR/9096
20/5/14

प्र. अभि (वि.नि.)
महोदय, उपरोक्त अ बाबत उचित कार्यवाही करुन कृपया अहवाल सादर करावा.

महापालिका आयुक्तांचे स्वीय चिटणीस

बृहन्मुंबई महानगर पालिका
प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांचे कार्यालय
20 MAY 2014
004651
क्र.प्र.अ./वि.नि./
साधारण | शहर | पूर्व. उप | प. उप
मा. अधि. | टिडीआर | लेखा | आस्था

DyChE(DP)-I

प्रमुख अभियंता (विकास नियोजन)

AODP

HC(DP)Gen
pl. circulate.

AODP
pl circulate to DP Revision office and attach to extension of time period file

Network/MAIN/D/ISM6/Singh/ letter/26

AODP

27/5/14
DyChE(DP)

**No. CHE/ 4651 /DP/Gen. dtd. 9/7/2014**

Ch.E.(D.P.)

Dy.Ch.E.(D.P.)-I / II/Dy.Ch.E.(B.P.)(City)/E.S./W.S.-I/W.S.-II

E.E.(D.P.)City/E.E.D.P.(E.S.)/E.E.(D.P.)W.S.H&K/P&R/E.E.P.to Ch.E.(D.P.)

E.E.(B.P.)City I/II/III/E.E.B.P.(E.S.) I/II/ E.E.B.P.(W.S.) H&K (P&R_

A.E.(D.P.) ................................ / S.E. (D.P.) ..................................

Copy ~~forwarded~~ submitted for information & further necessary action please

**Administrative Officer**
**(Development Plan)**

9/7/14
AE(DP) Gen

RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014-16

CHE/DP/19
2014-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक ४०(२)] मंगळवार, मार्च १८, २०१४/फाल्गुन २७, शके १९३५ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक १६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.**—महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. ... ... ... | १-५ |

दिनांक १५ मार्च २०१४ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१४ चे महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १८ मार्च २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६६ चा महा. ३७. २०१३ चा महा. अध्या. १५.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात सुधारणा करण्याच्या हेतूने, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, ४ ऑक्टोबर २०१३ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०१३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे) प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** नागपूर येथे ९ डिसेंबर २०१३ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमामध्ये रूपांतर करण्यासाठी सन २०१३ चे विधानसभा

विधेयक क्रमांक ३६ हे विधेयक ११ डिसेंबर २०१३ रोजी महाराष्ट्र विधानसभेत मांडण्यात आले होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाची २० डिसेंबर २०१३ रोजी सत्र समाप्ती झाल्याने राज्य विधानमंडळाकडून उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे १९ जानेवारी २०१४ नंतर, म्हणजेच राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, उक्त अध्यादेश अंमलात असण्याचे बंद झाले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अधिनियमात विवक्षित किरकोळ सुधारणा समाविष्ट केल्यानंतर उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटले ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात विवक्षित किरकोळ सुधारणा समाविष्ट केल्यानंतर, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; **आणि, म्हणून,** त्यांनी दिनांक २० फेब्रुवारी २०१४ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१४ प्रख्यापित केला होता ; **आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

(१९६६ चा महा. ३७.) (२०१४ चा महा. अध्या. ६.)

(संक्षिप्त नाव व प्रारंभ.)

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०१४ असे म्हणावे.

(२) तो, ४ ऑक्टोबर २०१३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या प्रकरण तीनच्या उपशीर्षकाची सुधारणा.)

**२.** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या प्रकरण तीन मधील, "विकास योजना" या शीर्षकाखालील उप शीर्षक "(अ) विकास योजना तयार करणे, सादर करणे व त्यास मंजुरी देणे.", या ऐवजी पुढील उपशीर्षक दाखल करण्यात येईल :–  (१९६६ चा महा. ३७.)

"(अ) उद्देश घोषित करणे, विकास योजना तयार करणे, सादर करणे व त्यास मंजुरी देणे.".

(सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २१ ची सुधारणा.)

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २१ मध्ये,–

(क) पोट-कलम (२) मध्ये, "विकास योजनेचा मसुदा तयार करील व तो अशा रीतीने तयार केला असल्याची नोटीस **राजपत्रात**" या मजकुराऐवजी "विकास योजनेचा मसुदा तयार करण्याबाबतचा आपला उद्देश घोषित करून अशी योजना तयार करील आणि ती अशा रीतीने तयार केली असल्याची नोटीस **राजपत्रात**" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) मध्ये,—

(एक) " विकास योजनेचा मसुदा " या मजकुराच्या आधी, "कलम २३ अन्वये विकास योजना तयार करण्याबाबतचा उद्देश घोषित केला नाही किंवा " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) "संबंधित विभागीय उप संचालक, नगररचना यास किंवा सहायक संचालक, नगररचना याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा त्याने नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यास, नगररचना संचालकाशी विचारविनिमय करून, त्या क्षेत्राचे आवश्यक ते सर्वेक्षण केल्यानंतर व विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर" या मजकुराऐवजी, "संबंधित विभागीय सहसंचालक किंवा उप संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण विभाग यास किंवा, यथास्थिति, सहायक संचालक, नगररचना याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा त्याने नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यास, उद्देश घोषित केल्यावर, आणि नगररचना संचालकाशी विचारविनिमय करून त्या क्षेत्राचे आवश्यक ते सर्वेक्षण केल्यानंतर

विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (४क) मध्ये,—

(एक) "२३," आणि ",२८" हा मजकूर वगळण्यात येईल;

(दोन) " संबंधित विभागीय उप संचालक, नगररचना याच्या द्वारे किंवा सहायक संचालक, नगररचना याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा त्याने नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याद्वारे " या मजकुराऐवजी "संबंधित विभागीय सहसंचालक किंवा उप संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण विभाग याच्याद्वारे किंवा, यथास्थिति, सहायक संचालक, नगररचना याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा त्याने नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याद्वारे" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(तीन) पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

"परंतु, उक्त अधिकारी, विकास योजना तयार करण्याचा टप्पा लक्षात घेऊन संचालक, नगररचना याच्या आदेशानुसार, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीमध्ये नियोजन प्राधिकरणाच्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि त्याची सर्व कर्तव्ये पार पाडील :

परंतु आणखी असे की, पहिल्या परंतुकान्वये विनिर्दिष्ट केलेला कालावधी हा, संबंधित कलमान्वये निर्धारित केलेल्या मूळ कालावधीपेक्षा अधिक असणार नाही.".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २५ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम २५ मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल:—

" परंतु, अशा प्रकारे वाढविण्यात आलेला कालावधी हा, कोणत्याही परिस्थितीत, एकूण एका वर्षापेक्षा अधिक असणार नाही.".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २६ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम २६ मध्ये, पोट-कलम (१) मधील,—

(एक) पहिल्या परंतुकाच्या आधी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल:—

"परंतु, अलिकडील जनगणनेनुसार दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांच्या बाबतीत, हरकती व सूचना मागविण्यासाठीचा कालावधी हा, **राजपत्रातील** सूचनेच्या दिनांकापासून साठ दिवस इतका असेल :";

(दोन) पहिल्या परंतुकामध्ये "परंतु," या मजकुराऐवजी "परंतु आणखी असे की," हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(तीन) दुसऱ्या परंतुकाऐवजी पुढील परंतुक दाखल करण्यात येईल:–

"परंतु तसेच, अशा प्रकारे वाढविण्यात आलेला कालावधी कोणत्याही बाबतीत,—

(एक) अलिकडच्या जणगणनेच्या आकडेवारीनुसार ज्या महानगरपालिकांची लोकसंख्या दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक आहे अशा शहरांच्या बाबतीत बारा महिने, आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत सहा महिने,

यापेक्षा अधिक असणार नाही.".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २८ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम २८ मध्ये,—

(क) पोट-कलम (२) मधील, दुसऱ्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :–

"परंतु आणखी असे की, विभागीय सहसंचालक किंवा उप संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण विभाग किंवा, यथास्थिति, कलम २१ च्या पोट-कलम (४) अन्वये त्याने नामनिर्देशित केलेला अधिकारी, नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर करील आणि त्याची कर्तव्ये पार पाडील तेव्हा, नियोजन समितीत असा विभागीय सहसंचालक किंवा उप संचालक किंवा, यथास्थिति, असा अधिकारी यांचा समावेश असू शकेल.";

(ख) पोट-कलम (३) मध्ये, " तिच्या नेमणुकीच्या दिनांकापासून दोन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीत " या मजकुराऐवजी " तिच्या नेमणुकीच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालावधीत किंवा

नियोजन प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा वाढविलेल्या कालावधीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३० ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ३० मधील पोट-कलम (१) मध्ये, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु, राज्य शासनास, नियोजन प्राधिकरणाच्या किंवा उक्त अधिकाऱ्याच्या अर्जावरून, लेखी आदेशाद्वारे आणि लेखी नमूद करण्यात येतील अशा पुरेशा कारणास्तव, उक्त कालावधी, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा आणखी कालावधीकरिता वेळोवेळी वाढविता येईल, परंतु, तो कालावधी कोणत्याही परिस्थितीत,—

(एक) अलिकडील जनगणनेच्या आकडेवारीनुसार दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांच्या बाबतीत, बारा महिन्यांपेक्षा अधिक नसेल; आणि

(दोन) अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर कोणत्याही बाबतीत, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल.".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३१ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मधील, पहिल्या परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु, राज्य शासनास, त्यास योग्य वाटल्यास मग उक्त कालावधी संपलेला असो किंवा नसो, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विकास योजनेच्या मसुद्याला मंजुरी देण्याचा किंवा ती मंजुरी नाकारण्यासाठीचा कालावधी,—

(एक) अलिकडील जनगणनेच्या आकडेवारीनुसार दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांच्या बाबतीत, बारा महिन्यांपेक्षा अधिक नसेल; आणि

(दोन) अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा, इतर कोणत्याही बाबतीत, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल,

अशा आणखी कालावधीकरिता वेळोवेळी वाढविता येईल : ";

(ख) पोट-कलम (२) मध्ये,—

(एक) " पहिल्या वर्गाच्या अधिकाऱ्यापेक्षा " या मजकुराऐवजी " गट-अ दर्जाच्या अधिकाऱ्यापेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " राज्य शासनाकडे " या मजकुराआधी " पोट-कलम (१) च्या दुसऱ्या परंतुकान्वये नोटीस प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) मध्ये, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

" परंतु, पोट-कलम (१) व (२) यामध्ये, तरतूद केलेली कालमर्यादा ही, पोट-कलम (१) खाली प्रसिद्ध केलेल्या फेरबदलांना मंजुरी देण्यासाठी लागू असणार नाही :

परंतु आणखी असे की, शासन, कलम ३१ च्या पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांकडून अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत अशा फेरबदलांच्या संबंधात अंतिम निर्णय घेईल.".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ यामध्ये कलम १४८-अ समाविष्ट करणे.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम १४८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विवक्षित बाबतीत कालावधी वगळणे.

**" १४८-अ.** या अधिनियमाची प्रकरणे दोन, तीन, चार आणि पाच यांच्या तरतुदींन्वये कोणत्याही विकास योजनेच्या, प्रादेशिक योजनेच्या किंवा परियोजनेच्या संबंधातील कालावधी मोजताना, कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही अंतरिम आदेशामुळे, ज्या कालावधीत किंवा कालावधींमध्ये उक्त प्रकरणांखालील कोणतीही कार्यवाही

पूर्ण करता येऊ शकलेली नसेल असा कालावधी किंवा असे कालावधी वगळण्यात येतील.".

**१०.** शंका निरसन करण्यासाठी यांद्वारे असे घोषित करण्यात येते की,— शंका निरसन करणे.

२०१४ चा महा ५. (एक) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०१४ (यात, यानंतर, ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे), याद्वारे, मुख्य अधिनियमात सुधारणा करण्यापूर्वी मुख्य अधिनियमाच्या तरतुदींमध्ये कोणतीही गोष्ट करण्यासाठी कालमर्यादा निश्चित केलेली नसल्यास, उक्त अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार अशी गोष्ट करण्यासाठी निश्चित केलेली कालमर्यादा ही, उक्त अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून मोजण्यात येईल ;

(दोन) उक्त अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमात सुधारणा करण्यापूर्वी मुख्य अधिनियमाची कलमे २१, २५, २६, २८, ३० व ३१ यांच्या तरतुदींच्या बाबतीत, कोणतीही गोष्ट करण्यासाठी कालमर्यादेबद्दलच्या तरतुदीची उक्त अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आली आहे तेथे अशा सुधारणेच्या परिणामी तरतूद करण्यात आलेला अतिरिक्त कालावधी, कोणताही असल्यास, हा, उक्त अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाची सुधारणा करण्यापूर्वीच्या तरतुदींनुसार मूळ कालमर्यादेचा कालावधी समाप्त झाल्याचा दिनांक किंवा उक्त अधिनियमाचा प्रारंभाचा दिनांक यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून मोजण्यात येईल.

२०१४ चा महा. अध्या. ६. **११.** (१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१४ याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ चे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**१२.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल असा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल असा निदेश **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, देता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, असा कोणताही आदेश महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) २०१४ चा महा. ५. अधिनियम, २०१४ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2014-16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ६, अंक १(२)] मंगळवार, मार्च १८, २०१४/फाल्गुन २७, शके १९३५ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक २८

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Regional and Town Planning (Amendment and Continuance) Act, 2014 (Mah. Act No. V of 2014), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. V OF 2014.

(First published, after having received the assent of the Governor in the *"Maharashtra Government Gazette"*, on the 18th March 2014).

An Act further to amend the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

WHEREAS the Governor of Maharashtra with a view to amend the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, promulgated the Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Ordinance, 2013, on the 4th October 2013 (hereinafter referred to as "the said Ordinance"); Mah. XXXVII of 1966. Mah. Ord. XV of 2013.

AND WHEREAS upon the re-assembly of the State Legislature on the 9th December 2013, at Nagpur, a Bill for converting the said Ordinance into an Act of the State Legislature was introduced in the Maharashtra Legislative Assembly as L. A. Bill No. XXXVI of 2013, on the 11th December 2013 ;

AND WHEREAS the said Bill could not be passed by the State Legislature, as the session of the State Legislature was prorogued on the 20th December 2013 ;

AND WHEREAS as provided by article 213 (2) (a) of the Constitution of India, the said Ordinance ceased to operate after 19th January 2014, the date on which the period of six weeks from the date of re-assembly of the State Legislature expired ;

AND WHEREAS it is considered expedient to continue the operation of the said Ordinance after incorporating certain minor amendments to the said Act ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action to continue the operation of the provisions of the said Ordinance after incorporating certain minor amendments to the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Maharashtra Regional and Town Planning (Amendment and Continuance) Ordinance, 2014, on the 20th February 2014 ; Mah. XXXVII of 1966. Mah. Ord. VI of 2014.

AND WHEREAS, it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixty-fifth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Regional and Town Planning (Amendment and Continuance) Act, 2014.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 4th October 2013.

Amendment of Heading of Chapter III of Mah. XXXVII of 1966.

**2.** In Chapter III of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the principal Act "), under the heading " DEVELOPMENT PLAN ", for sub-heading " (*a*) *Preparation, submission and sanction to Development plan.*", the following sub-heading shall be substituted, namely :- Mah. XXXVII of 1966.

" (*a*) *Declaration of intention, preparation, submission and sanction to Development plan.*".

Amendment of section 21 of Mah. XXXVII of 1966.

**3.** In section 21 of the principal Act,–

(*a*) in sub-section (*2*), for the words " prepare a draft Development plan and publish a notice of such preparation in the *Official Gazette* " the words " declare its intention to prepare a draft Development plan, prepare such plan and publish a notice of such preparation in the *Official Gazette* " shall be substituted ;

(*b*) in sub-section (*4*),—

(*1*) for the words " If the draft Development plan is not submitted " the words and figures " If the declaration of intention to prepare Development plan under section 23 is not made or if the draft Development plan is not submitted " shall be substituted ;

(*2*) for the words " the concerned Divisional Deputy Director of Town Planning or an officer nominated by him who is not below the rank of Assistant Director of Town Planning may, after carrying out the necessary survey of the area and preparing an existing-land-use map in consultation with the Director of Town Planning ", the words "the concerned Divisional Joint Director or Deputy Director of Town Planning and Valuation Department or an officer not below the

rank of an Assistant Director of Town Planning nominated by him, as the case may be, may after declaring the intention, carry out necessary survey of the area and prepare an existing-land-use map in consultation with the Director of Town Planning and" shall be substituted ;

(*c*) in sub-section (*4A*),—

(*1*) the figures "23," and ", 28" shall be deleted;

(*2*) for the words "the concerned Divisional Deputy Director of Town Planning or an Officer nominated by him who is not below the rank of Assistant Director of Town Planning" the words "the concerned Divisional Joint Director or Deputy Director of Town Planning and Valuation Department or an officer nominated by him not below the rank of an Assistant Director of Town Planning, as the case may be," shall be substituted ;

(*3*) the following provisos shall be added, namely :—

"Provided that, the said Officer shall exercise all the powers and perform all the duties of the Planning Authority within such period as may be specified by an order by the Director of Town Planning, having regard to the stage of preparation of Development plan:

Provided further that, the period specified under the first proviso shall not exceed the original period stipulated under the relevant section.".

Amendment of section 25 of Mah. XXXVII of 1966.

**4.** To section 25 of the principal Act, the following proviso shall be added, namely :—

"Provided that, the period so extended shall not in any case exceed one year in the aggregate.".

Amendment of section 26 of Mah. XXXVII of 1966.

**5.** In section 26 of the principal Act, in sub-section (*1*),—

(*1*) before the first proviso, the following proviso shall be inserted, namely :—

"Provided that, in case of a Municipal Corporation having population of ten lakhs or more as per the latest census, the period for inviting objections and suggestions shall be sixty days from the date of notice in the *Official Gazette* :";

(*2*) in the first proviso, for the words "Provided that" the words "Provided further that" shall be substituted;

(*3*) for the second proviso, the following proviso shall be substituted, namely :—

"Provided also that, the period so extended shall not in any case, exceed—

(*i*) twelve months, in the aggregate, in case of a Municipal Corporation having a population of ten lakhs or more, as per the latest census figures, and

(*ii*) six months, in the aggregate, in any other case." .

Amendment of section 28 of Mah. XXXVII of 1966.

**6.** In section 28 of the principal Act,—

(*a*) in sub-section (*2*), for the second proviso, the following proviso shall be substituted, namely :—

"Provided further that, where the Divisional Joint Director or Deputy Director of the Town Planning and Valuation Department or

an Officer nominated by him under sub-section (*4*) of section 21, as the case may be, exercises the powers and performs the duties of the Planning Authority, then the Planning Committee may consist of such Divisional Joint Director or Deputy Director or, as the case may be, of such officer.";

(*b*) in sub-section (*3*), for the words "not later than two months from the date of its appointment" the words "within a period of two months from the date of its appointment or within such extended period as the Planning Authority may specify" shall be substituted.

Amendment of section 30 of Mah. XXXVII of 1966.

**7.** In section 30 of the principal Act, in sub-section (*1*), for the proviso, the following proviso shall be substituted, namely :—

"Provided that, the State Government may, on an application by a Planning Authority or the said Officer by an order in writing, and for adequate reasons which should be recorded, extend from time to time, the said period by such further period as may be specified in the order but not in any case exceeding,—

(*i*) twelve months, in case of a Municipal Corporation having population of ten lakhs or more, as per the latest census figures, and

(*ii*) six months, in any other case, as may be specified in such order.".

Amendment of section 31 of Mah. XXXVII of 1966.

**8.** In section 31 of the principal Act,—

(*a*) in sub-section (*1*), for the first proviso, the following proviso shall be substituted, namely :—

" Provided that, the State Government may, if it thinks fit, whether the said period has expired or not, extend from time to time, by notification in the *Official Gazette*, the period for sanctioning the draft Development plan or refusing to accord sanction thereto, by such further period not exceeding,—

(*i*) twelve months, in case of a Municipal Corporation having population of ten lakhs or more, as per the latest census figures, and

(*ii*) six months, in any other case, as may be specified in such notification :" ;

(*b*) in sub-section (*2*),—

(*i*) for the words and figure "Class I officer" the words and letter " Group A officer" shall be substituted;

(*ii*) after the words "to the State Government" the following shall be inserted, namely :—

" within one year from the date of publication of notice under second proviso to sub-section (*1*) " ;

(*c*) to sub-section (*3*), the following provisos shall be added, namely :—

" Provided that, the time-limits as provided in sub-sections (*1*) and (*2*) shall not apply for according sanction to the modifications published under sub-section (*1*):

Provided further that, the Government shall take final decision regarding such modifications within one year from the date of receipt of the report from the officer appointed under sub-section (*2*).".

Insertion of section 148-A in Mah. XXXVII of 1966.

**9.** After section 148 of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Exclusion of time in certain cases.

"**148-A.** In computing the period, in relation to any Development plan, Regional plan or scheme under the provisions of Chapters II, III, IV and V of this Act, the period or periods during which any action could not be completed under the said Chapters, due to any interim order of any Court, shall be excluded.".

Removal of doubt.

**10.** For the removal of doubt it is hereby declared that,—

Mah. V of 2014.

(*i*) where the provisions of the principal Act, prior to its amendment by the Maharashtra Regional and Town Planning (Amendment and Continuance) Act, 2014 (hereinafter referred to as "the said Act") do not fix any time-limit for doing anything, the time-limit for doing such thing fixed in accordance with the provisions of the principal Act, as amended by the said Act shall be reckoned from the date of commencement of the said Act;

(*ii*) where the provisions of sections 21, 25, 26, 28, 30 and 31 of the principal Act, prior to its amendment by the said Act, provide for time-limit for doing anything, which has been revised by the said Act, the additional period, if any, due to such revision shall be reckoned from the date of expiry of the original time period obtaining in the relevant provision, prior to the amendment of the principal Act, by the said Act or the date of commencement of the said Act, whichever is later.

Repeal of Mah. Ord. VI of 2014 and saving.

Mah. Ord. VI of 2014.

**11.** (*1*) The Maharashtra Regional and Town Planning (Amendment and Continuance) Ordinance, 2014, is hereby repealed.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the provisions of the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

Power to remove difficulty.

**12.** (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of the principal Act, as amended by this Act, the State Government may, by order published in the *Official Gazette*, give such directions, not inconsistent with the provisions of this Act, as may appear to it to be necessary or expedient for the purpose of removing the difficulty :

Provided that, no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of the Maharashtra Regional and Town Planning (Amendment and Continuance) Act, 2014. Mah. V of 2014.

(*2*) Every order made under sub-section (*1*) shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

9. After section 148 of the principal Act, the following section shall be inserted, namely:—

Insertion of section 148A in Mah. XXXVII of 1966.

"148A. In computing the period [illegible] Regional Plan, Development plan, Town Planning scheme under the provisions of Chapters [illegible] of this Act, the period [illegible] during which any action could not be taken under [illegible] by any interim order of any Court, shall be excluded."

Exclusion of time in certain cases.

10. For the removal of doubts, it is hereby declared that—

Removal of doubts.

(1) where the provisions of the principal Act, prior to its amendment by the Maharashtra Regional and Town Planning (Amendment and Continuance) Act, 2014 (hereinafter referred to as "the said Act") do not fix any time-limit for doing anything, the time-limit for doing such thing fixed in accordance with the provisions of the principal Act, as amended by the said Act, shall be reckoned from the date of commencement of the said Act;

(2) where the provisions of sections 21, 23, 26, 28, 30 and 31 of the principal Act, prior to its amendment by the said Act, provide for time-limit for doing anything which has been revised by the said Act, the additional period, if any, due to such revision shall be reckoned from the date of expiry of the original time period stipulated in the relevant provisions prior to the amendment of the principal Act by the said Act or the date of commencement of the said Act, whichever is later.

11. (1) The Maharashtra Regional and Town Planning (Amendment and Continuance) Ordinance, 2014, is hereby repealed.

Repeal of Mah. Ord. VI of 2014 and saving.

(2) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the provisions of the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

12. (1) If any difficulty arises in giving effect to the provisions of the principal Act, as amended by this Act, the State Government may, by order published in the Official Gazette, give such directions, not inconsistent with the provisions of this Act, as may appear to it to be necessary or expedient for the purpose of removing the difficulty:

Power to remove difficulty.

Provided that no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of the Maharashtra Regional and Town Planning (Amendment and Continuance) Act, 2014.

(2) Every order made under sub-section (1) shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.